SBTC राज्य रक्त संक्रमण परिषद
State Blood Transfusion Council
महाराष्ट्र राज्य
रविंद्र अनेक्स, ५वा मजला, दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट रिक्लेमेशन, मुंबई-४०००२०
टेलि : २२८३०२१६ फॅक्स : २२८५४९८१ E-Mail: sbtc@mahasbtc.com

# थेटमुलाखत

## जहिरात

राज्य रक्त संक्रमण परिषद( जी एक स्वायत्त आणि नोंदणीकृत विश्वस्तसंस्था आहे) मार्फत खालील पद कंत्राटी पध्दतीने शासकीय रक्तपेढीमध्ये भरण्यासाठी थेट मुलाखती घेण्यात येत आहे. त्याचा तपशील पूढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नाव | पदाचेनाव | एकूण पदे | शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकत्रित मानधन | थेट मुलाखतीची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय, परभणी | रक्त संक्रमण अधिकारी (प्रत्येकी १ पद) | १ | M.B.B.S. नंतर रक्तपेढी कामकाजाचा १ वर्षाचा अनुभव किंवा फक्त M.B.B.S. असल्यास उमेदवारास प्रशिक्षणार्थी रक्त संक्रमण अधिकारी म्हणून नियूक्त करण्यात येईल, किंवा<br>M.B.B.S. व D.C.P. किंवा<br>M.D. पॅथॉलोजी / ट्रान्सफयुजन मडिसीन | रु. ३००००/-<br>रु. ३५०००/-<br>रु. ४००००/- | दि.१४.११. २०१९ सकाळी:११:०० वाजता नाव नोंदणी<br>संबधित: जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय, परभणी यांचे कार्यालय |

सूचना:

१. पदव्यूत्तर(MD Pathology) or MD(Transfusion Medicine) अथवा पदवी (MBBS) अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा व ज्यांनी कमीत कमी एक वर्ष शासकीय सेवा करण्याचे बंधपत्र/ हमीपत्र दिले आहे अशा उमेदवारांची रक्त संक्रमण अधिकारी या पदी नियूक्ती झाल्यास, त्यांची सेवा बंधपत्रीत सेवेच्या व्याप्तीमध्ये येईल.

२. वरिल पदासाठी कमाल वयोमर्यादा ३८ असेल व ती सूयोग्य प्रकरणी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम असेल. सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यास कमाल वयोमर्यादा ६२ असेल जीसुध्दा सुयोग्य प्रकरणी ६५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहिल.

३. वरिल पद निव्वळ कंत्राटी स्वरुपातील असून राज्य रक्त संक्रमण परिषदे मार्फत भरण्यात येत आहेत.

४. वरिल पदासाठी प्रतिक्षायादी करण्यात येणार आहे.

५. या पदासाठीचे वेतन हे एकत्रित मानधन आहे.

६. उच्च शैक्षणिक धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारांस प्राध्यान्य दिले येईल.

७. वरिल पदाच्या उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे व मराठी लिहिता व बोलता येणे आवश्यक आहे.

८. निवड झालेल्या उमेदवारांस सुरुवातीला ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणूक दिली जाईल.

९. उमेदवाराने विहित नमून्यातील अर्ज, मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह थेट मुलाखतीसाठी उपस्थित राहावे. अर्ज सुचना क्र.११ अ व ब मधील नुसार असावा.

१०. अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेण्यात येईल.

११. अर्जदाराने अर्ज **A4** आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्भुत असाव्यात.

अ) उमेदवाराची सर्वसाधारण माहिती–

१) अर्ज केलल्या पदाचे नांव २) ठळक अक्षरात स्वतःचे नाव ३) अर्जदाराचा पत्ता, दुरध्वनी क्रमांक/भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) ४) कामाचा अनुभव– काम केलेली संस्था, धारण केलेले पद, कालावधी, पदाची जबाबदारी व वेतन ५) शैक्षणिक अर्हतेचा पूर्ण तपशिल– अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, विद्यापिठाचे नाव उत्तीर्ण झाल्याचे वर्ष, गुणांची टक्केवारी इ.

ब) आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती व मुळ कागदपत्रे–

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे २) शाळा सोडल्याचा दाखला– जन्मतारखेचा दाखला, ३) अनुभवाची प्रमाणपत्रे ४) पासपोर्ट आकाराचे २ फोटो.

१२. थेट मुलाखतीस दि. १४.११.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता नाव नोंदणी करणे आवश्यक आहे.

१३. अर्जदाराने राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई येथे अर्ज पाठवू नये. त्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१४. अर्जदाराने संबधित जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, परभणी येथेच वरिल दर्शविलेल्या तारखेस थेट मुलाखतीस उपस्थित राहावयाचे आहे.

१५. उमेदवारांना थेट मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१६. उमेदवाराने चुकीची माहिती / कागदपत्रे दिल्यास उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच अशा उमेदवाराची नियूक्ती झाल्यास त्याची नियुक्ती समाप्त होईल.

१७. सदर जाहिराती मध्ये कोणताही बदल किंवा रद्द करण्याचे अथवा निवड यादी कोणत्याही वेळी रद्द करण्याचे अधिकार राज्य रक्त संक्रमण परिषदेस आहेत.

सही

संचालक, राज्य रक्त संक्रमण परिषद